09-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/8/2025 11:10 PM Page 1



वेस्टर्न बायपासजवळील पूरस्थिती रोखण्यासाठी सेरावलीत पाहणी » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



लखनौसाठी आज 'जिंका किंवा मरा' » पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ९ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 246 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 9 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### जम्मूत मुसळधार पाऊस, भूस्खलन

**जम्मू, दि. ८ :** जम्मू आणि काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे गुरुवारी अनेक ठिकाणी भूस्खलनच्या घटना घडल्या. रामबनमधील जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर (एनएच-४४) चिखल साचल्यामुळे वाहतूक बंद करण्यात आली आहे.
वाहतूक विभागाच्या म्हणण्यानुसार, सकाळी ७.३० वाजल्यापासून रस्ता बंद आहे. अनेक वाहने चिखलात अडकली आहेत, ती काढली जात आहेत. मुसळधार पावसामुळे, चिनाब नदीवरील रामबन येथील बागलिहार धरणाचे दोन आणि रियासी येथील सलाल धरणाचे एक दरवाजे उघडण्यात आले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही धरणे बंद करण्यात आली. हवामान खात्याने ११ मे पर्यंत केंद्रशासित प्रदेशातील काही भागात हलका ते मध्यम पाऊस आणि जोरदार वारे राहण्याची शक्यता वर्तवली आहे. काही भागात मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि चिखल कोसळण्याची शक्यता आहे. याशिवाय, विभागाने आज उत्तर प्रदेश-छत्तीसगडसह १९ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा जारी केला आहे.

---

### लाहोर सोडण्याच्या नागरिकांना सूचना

**नवी दिल्ली, दि. ८ :** जम्मू आणि काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारत सरकारने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध चांगलेच ताणले गेले आहेत. भारत पाकिस्तान यांच्यातील वाढत्या तणावादरम्यान अमेरिकेने पाकिस्तानच्या लाहोरमध्ये असलेल्या त्यांच्या नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.
ड्रोनचे स्फोट, ड्रोन पाडल्याचे तसेच लाहोरच्या जवळपासच्या हवाई हद्दीत घुसखोरी झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानच्या लाहोरमधील त्यांच्या वाणिज्य दूतावासातील सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

---

### निशिकांत दुबेविरोधात महुआ न्यायालयात

**नवी दिल्ली, दि. ८ :** तृणमूल काँग्रेस (टीएमसी) नेत्या महुआ मोईत्रा यांनी गुरुवारी दिल्ली उच्च न्यायालयात नवीन अर्ज दाखल केला. यामध्ये त्यांनी भाजप खासदार निशिकांत दुबे आणि वकील जय अनंत देहादराय यांनी त्यांच्याविरुद्ध केलेल्या सोशल मीडिया पोस्टबाबत तक्रार दाखल केली. लोकसभा खासदार महुआ मोईत्रा यांच्या वतीने वकील समुद्र सारंगी यांनी बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाला सांगितले की देहादराय यांचे ट्विट प्रत्यक्षात दुबे यांच्या फेसबुक पोस्टचा स्क्रीनशॉट आहे. अंतरिम अर्जात, मोइत्रा यांच्या वकिलाने न्यायालयाला दुबे आणि देहादराय यांना पोस्ट काढून टाकण्याचे निर्देश देण्याची विनंती केली. दुबे यांच्या वकिलाने सांगितले की, ही पोस्ट मोइत्रा यांच्याविरुद्धच्या तक्रारीवरील लोकपालच्या निर्णयावर आधारित आहे. लोकपालच्या निकालावर दुबे यांनी ठेवलेला विश्वास प्रथमदर्शनी मोईत्रा यांच्यावरील आरोपांना समर्थन देत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

---

### २७ विमानतळे आजपर्यंत बंद

**नवी दिल्ली, दि. ८ :** पाकिस्तानवरील हवाई हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्राने ९ मे पर्यंत ७ राज्यांमधील २७ विमानतळ बंद केले आहेत. ही राज्ये जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आहेत. प्रमुख विमानतळांमध्ये श्रीनगर, जम्मू, लेह, चंदीगड, जोधपूर, राजकोट, धर्मशाला, अमृतसर, भुज आणि जामनगर यांचा समावेश आहे. हे विमानतळ पाकिस्तान सीमेला लागून आहेत. मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर विमानतळ आणि उत्तर प्रदेशातील हिंडन विमानतळावरील कामकाज देखील बंद आहे.

# पाकिस्तानची हवाई संरक्षण प्रणाली नष्ट

## लाहोर, कराची , रावळपिंडीसह पाकिस्तानच्या ९ शहरात भारताचे ड्रोनहल्ले!

■ नवी दिल्ली, दि. ८ :

**ऑपरेशन 'सिंदूर' नंतर भारत आणि पाकिस्तानदरम्यान सीमावर्ती भागात तणाव वाढत असून, दोन्ही देशांनी एकमेकांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माध्यमातून लष्करी तळांवर हल्ला केल्याचे आरोप केले आहेत. भारतीय संरक्षण मंत्रालयाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, पाकिस्तानच्या लाहोरमध्ये एक हवाई संरक्षण प्रणाली नष्ट करण्यात आली आहे.**

भारतीय संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानने ७ मे रोजी जम्मू-कश्मीर व पंजाबमधील अनेक लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या साहाय्याने हल्ल्याचा प्रयत्न केला. यामध्ये अवंतीपोरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज यांचा समावेश होता. मात्र, भारतीय लष्कराच्या इंटिग्रेटेड काउंटर-यूएएस ग्रीड आणि एअर डिफेन्स प्रणालीमुळे हे हल्ले निष्फळ ठरले, असे मंत्रालयाने स्पष्ट केले.

भारताकडूनही पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आल्याचा दावा संरक्षण मंत्रालयाने केला आहे. गुरुवारी सकाळी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई कारवाई करून तेथील एअर डिफेन्स रडार आणि प्रणाली लक्ष्य केल्याची माहिती मिळाली आहे. लाहोरमधील एअर डिफेन्स सिस्टिम नष्ट झाल्याची विश्वसनीय माहिती मिळाली असल्याचेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, पाकिस्ताननेही प्रत्यारोप करत भारतावर ड्रोनच्या माध्यमातून हल्ल्याचा आरोप केला आहे. पाकिस्तान लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ७ मेच्या रात्रीपासून भारताकडून ड्रोनच्या मदतीने घुसखोरीचा प्रयत्न सुरू आहे. पाकिस्तानने लाहोर, गुजरांवाला, चकवाल, अटक, रावळपिंडी, मियांवली आणि कराचीमध्ये भारताचे एकूण २५ ड्रोन पाडल्याचा दावा केला आहे.

दरम्यान, भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी गुरुवारी इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची यांच्यासोबत झालेल्या बैठकीत भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. सीमेपलीकडून हल्ला झाल्यास भारत त्याला कठोर प्रत्युत्तर देईल,असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.

जयशंकर यांनी ट्विटरवर पोस्ट करत २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची माहिती दिली. या हल्ल्यामुळे भारताला सीमापार कारवाई करावी लागली, असेही त्यांनी नमूद केले.



या पार्श्वभूमीवर गुरुवारी नवी दिल्ली येथे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक झाली. बैठकीत 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भात सर्व पक्षांच्या नेत्यांना माहिती देण्यात आली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले की, सर्वपक्षीय बैठकीत लष्कराच्या कारवायांना सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला आहे. ऑपरेशन सिंदूर अजून सुरू असून, सरकारने गंभीर आणि ठाम भूमिकाच घेतली आहे.

दरम्यान, पाकिस्तानने नियंत्रण रेषेवर ही मोर्चे उघडले असून, कुपवाडा, बारामुला, उरी, पुंछ, मेंढर आणि राजौरी येथे मोर्टार आणि तोफगोळ्यांचा वापर करत गोळीबार केल्याचा आरोप भारताने केला आहे. या गोळीबारात तीन महिला आणि पाच बालकांसह एकूण १६ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असल्याचे संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले.

### पाकिस्तानकडून शीख समुदायाला लक्ष्य

**जम्मू आणि काश्मीरमधील पूंछ सेक्टरमध्ये सीमेपलीकडून झालेल्या गोळीबारात पाकिस्तानने शीख समुदायाला लक्ष्य केले आहे, असे भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की, पाकिस्तानी गोळीबारात एका गुरुद्वाराला लक्ष्य करण्यात आले होते, ज्यामध्ये शीख समुदायाचे तीन लोक मृत्युमुखी पडले. पहलगाम हल्ल्यासाठी भारत द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) ला जबाबदार धरतो. राजधानी दिल्लीत पत्रकार परिषदेत मिस्त्री म्हणाले की, टीआरएफ ही पाकिस्तानस्थित अतिरेकी संघटना लष्कर-ए-तैयबाची एक आघाडी आहे. लष्कर-ए-तैयबा ही संयुक्त राष्ट्रांनी बंदी घातलेली संघटना आहे. पाकिस्तानने कोणत्याही गटाला भारताविरुद्ध आपली भूमी वापरण्याची परवानगी दिल्याचा इन्कार केला आहे. भारतीय हवाई हल्ल्यांमुळे नीलम-झेलम धरणाचे नुकसान झाले हा पाकिस्तानचा दावा मिस्त्री यांनी पूर्णत: खोटा असल्याचे म्हटले. ते म्हणाले की भारताने फक्त पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले आहे.**

# मडगाव बाजारपेठेतील ४५० हून अधिक दुकाने हाय अलर्टवर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ८ :** गेल्या डिसेंबरमध्ये घडलेल्या आगीच्या घटनेनंतरही मडगावच्या नवीन बाजारपेठेतील अग्निसुरक्षा उपाययोजनांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असून, सुमारे ४५० दुकाने आणि त्यामध्ये काम करणाऱ्या शेकडो नागरिकांचे जीव धोका पत्करत आहेत.

२६ डिसेंबर २०२३ रोजी बाजार परिसरात लागलेल्या भीषण आगीमुळे संपूर्ण शहर हादरले होते. सुदैवाने व्यापाऱ्यांची जागरूकता आणि अग्निशामक दलाची तत्काळ कारवाई यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, या घटनेनंतरही प्रशासनाने शहाणपणाचा पाठ घेतलेला नाही, अशी तिव्र प्रतिक्रिया व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संयुक्त तपासणी अहवालानुसार, बाजारात ओव्हरहेड वॉटर टँक व कार्यक्षम फायर हायड्रंट्स तत्काळ बसविण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र, पाच महिने उलटूनही कोणतीही ठोस कृती झालेली नाही.

आजही बाजारात ना पाण्याची टाकी आहे, ना अग्निशमनासाठी आवश्यक साधनसामग्री कार्यरत आहे. उद्या जर पुन्हा आग लागली, तर त्याचे परिणाम भीषण असतील, असा गंभीर इशारा मडगाव मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष दामोदर गोडे यांनी दिला. त्यांनी सांगितले की, बाजार समितीने वेळोवेळी मडगाव नगर परिषदेकडे लेखी निवेदने दिली आहेत, मात्र त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही.

बाजारातील विक्रेत्या शोभा गावकर म्हणाल्या की , आग लागल्यास अग्निशामक दलाच्या वाहनांना येथे प्रवेश मिळत नाही. हायड्रंट्स पूर्णपणे निकामी आहेत. हे केवळ जीवाशी खेळ आहे.

दुकानमालक राजेंद्र आजगावकर यांचीही तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, महिन्यांपासून आम्हाला पाण्याच्या टाकीविषयी आश्वासन दिले जात आहे. पण प्रत्यक्षात काम सुरू होण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाही.

बाजारातील रस्ते आणि पदपथ अतिक्रमणाच्या विळख्यात असून, नियोजित पार्किंगचा अभाव असल्याने आपत्कालीन पान २ ▶

# लईराई जत्रोत्सवात देवस्थान समिती सजग

- देवस्थान समितीकडून स्पष्ट
- प्रशासनाच्या दिरंगाईमुळे काही महत्त्वाच्या व्यवस्थांमध्ये त्रुटी

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**शिरगाव : पत्रकार परिषदेत माहिती देताना लईराई देवस्थान समितीचे अध्यक्ष दीनानाथ गावकर. बाजूला भास्कर गावकर, आतिष गावकर, दयानंद गावकर व इतर समिती पदाधिकारी व ग्रामस्थ.**

**डिचोली, दि. ८ :** शिरगाव येथील लईराई देवीच्या जत्रोत्सवामध्ये देवस्थान समितीने सर्वतोपरी जबाबदारीने आपले कर्तव्य बजावले असून कोणत्याही व्यवस्थापनामध्ये समिती अपयशी ठरलेली नाही. मात्र, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे काही महत्त्वाच्या व्यवस्थांमध्ये त्रुटी निर्माण झाल्या, असा ठपका देवस्थान समितीने पत्रकार परिषदेत ठेवला.

नूतन देवस्थान समितीचे अध्यक्ष दीनानाथ गावकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, गेल्या वर्षी जत्रोत्सवात घडलेली घटना अतिशय दुर्दैवी होती. त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या वर्षी विशेष खबरदारी घेणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासनाने वेळेवर उपाययोजना न केल्यामुळे काही गंभीर बाबींना सामोरे जावे लागले.

गावकर यांनी स्पष्ट केले की, नवीन समितीने २ एप्रिल रोजी कार्यभार स्वीकारल्यानंतर तातडीने प्रशासनाशी पत्रव्यवहार करून २ तारखेला मामलेदारांना पत्र दिले. त्यानंतर बैठकांची मालिका झाली, परंतु अनेक बैठकांमध्ये संबंधित अधिकारी अनुपस्थित राहिले. अखेर ३० एप्रिल रोजी पोलीस अधीक्षक अक्षत कौशल यांच्या उपस्थितीत व्यापक बैठक घेण्यात आली.

या बैठकीत विविध महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले. गेल्या वर्षी जिथे अपघात घडला होता, त्या 'हॉटस्पॉट' ठिकाणी असलेली भिंत हटविण्याची मागणी आधीच करण्यात आली होती. पंचायतीने यासंदर्भात नोटीसही दिली होती. मात्र, त्या भिंतीला स्थगिती देण्यात आल्याने यंदाही त्या ठिकाणी अडचण निर्माण झाली, असा आरोपही समितीने केला.

जत्रोत्सवाच्या दिवशी घटनास्थळी पोलिस बंदोबस्त अपुरा असल्याचाही उल्लेख समितीने केला. समितीच्या म्हणण्यानुसार, अल्प वेळात आम्ही प्रशासनाशी सातत्याने संपर्क साधून उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा केला. मात्र, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे काही त्रुटी राहिल्या. पान २ ▶

# एलईडी मासेमारी बंदीप्रकरणी उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

## बंदीची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश | पारंपरिक मच्छीमारांकडून स्वागत

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ८ :** एलईडी मासेमारीवरील बंदीच्या कायद्याची प्रभावी अंमलबवजावणी झालीच पाहिजे असा निकाल उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने गुरुवारी दिला. मासेमारी बोटींवर जनरेटर वाहून नेण्यास कायद्याने बंदी घालता येत नसली तरी एलईडी मासेमारी, बुल ट्रॉलिंग आणि पेअर ट्रॉलिंग संबंधात असलेल्या राज्य आणि केंद्र शासनाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी झालीच पाहिजे अशा सक्त सूचना न्यायालयाने राज्य सरकारला दिल्या आहेत. या संबंधात सविस्तर अशा सात वेगवेगळ्या सूचना न्यायालयाने संबंधित विभागांना केल्या आहेत. पारंपरिक मच्छीमारांनी न्यायालयाच्या या निकालाचे स्वागत केले असून अंमलबजावणी समितीत मच्छीमारांच्या प्रतिनिधींचा समावेश असावा, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

जवळपास वर्षभरापासून राखीव असलेला एलईडी मासेमारी बंदीच्या अंमलबजावणी संबंधात दाखल असलेल्या याचिकेवर अखेर उच्च न्यायालयाने गुरुवारी निकाल दिला. एलईडी मासेमारी, बुल ट्रॉलिंग, जोडी ट्रॉलिंग याबाबतच्या असलेल्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. राज्य सरकारच्या मत्स्यविभागासोबतच तटरक्षक दलालाही न्यायालयाने याबाबतच्या अंमलबजावणी संबंधात निर्देश दिले असल्याने पारंपरिक मच्छीमारांना या निकालामुळे दिलासा मिळाला आहे.



मत्स्यविभागाने मासेमारी बोटींवर डिझेल जनरेटर वाहून नेण्याची परवानगी दिल्यामुळे या जनरेटरचा वापर एलईडी मासेमारीसाठी केला जातो. त्यामुळे असे डिझेल जनरेटर वाहून नेण्यास बंदी घालण्यात यावी, अशी प्रमुख मागणी याचिकाकर्त्यांनी आपल्या याचिकेत केली होती. मात्र, डिझेल जनरेटरवर बंदी घालण्याबत कोणता कायदा अस्तित्वात नसल्याने न्यायालयाने मच्छीमारांची ही मागणी फेटाळली आहे. परंतु, एलईडी मासेमारीवरील बंदीची कडक अंमलबजावणी झालीच पाहिजे हे मान्य करीत तटरक्षक दल, राज्य सरकार आणि संबंधित विभागांना कडक सूचना केल्या आहेत. इतकेच नाही तर सरकारकडून गस्ती नौका खरेदी करण्याबाबत होत असलेल्या विलंबाबद्दलही तीव्र नाराजी व्यक्त करीत अंमलबजावणी यंत्रणा विकसित करण्याचे आदेश दिले आहेत.

### निर्णयातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे

**१ : बंदीच्या अंमलबजावणीसाठी कडक उपाययोजना करण्याचे आदेश : मत्स्यव्यवसाय संचालक आणि सागरी कायद्यानुसार अधिकृत अधिकाऱ्यांनी एलईडी मासेमारी, बुल ट्रॉलिंग आणि जोडी ट्रॉलिंगवरील बंदीची १०० टक्के अंमलबजावणी करावी. भारत सरकारच्या १० नोव्हेंबर २०१७ च्या बंदी आदेशाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी. गरज भासल्यास गोवा कोस्टल पोलिस आणि तटरक्षक दलाची मदत घ्यावी.**

**२: मासेमारी जेट्ट्यांवर नियमित तपासणी : उत्तर आणि दक्षिण गोव्यातील सर्व सहा अधिकृत जेट्ट्यांवर तपासणी केली जाईल. खाजगी जेट्ट्यांवर देखील मासेमारी जहाजांची आणि उपकरणांची तपासणी केली जाणार. परवान्यांची वैधता आणि कायद्याचे पालन तपासले जाईल. नियमभंग करणाऱ्या जहाजांची नोंदणी व परवाने तात्काळ रद्द/निलंबित करण्याचे निर्देश.**

**३ : तक्रार निवारणासाठी हेल्पलाईन व ईमेल सेवा : जनतेकडून तक्रारी मिळाव्यात यासाठी एक समर्पित मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी सुरू केला जाईल. २४ तास चालणारी हेल्पलाईन सेवा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश. प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीची नोंद सॉफ्ट कॉपी स्वरूपात ठेवली जाईल आणि कारवाईचा तपशील नोंदवला जाईल.**

**४: कोस्टल पोलिसांकडील स्पीडबोटी अकार्यक्षम; केंद्राकडे नव्या बोटींची मागणी : अनेक स्पीडबोटी कार्यरत नसल्याचे गृह विभागाच्या अहवालातून स्पष्ट. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत ५ + ७ गस्ती बोटींच्या खरेदीसाठी केंद्राकडे प्रस्ताव. गोवा सरकारने ३ नवीन इंटरसेप्टर बोटी खरेदीसाठी प्रस्ताव दिला. या खरेदी प्रक्रियेचा अहवाल ९ जून २०२५ रोजी सादर करण्याचे निर्देश.**

**५: अंमलबजावणी शाखेसाठी नवीन यंत्रणा : ५८ कर्मचाऱ्यांची स्वतंत्र अंमलबजावणी शाखा स्थापन करण्याचा प्रस्ताव. ही शाखा कोस्टल पोलिसांशी समन्वय साधून कार्य करणार. प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळालेली असून लवकरात लवकर भरती व प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आदेश.**

**६ : तटरक्षक दलाकडून समुद्रात हवाई आणि नौदल गस्त : तटरक्षक महासंचालक नियमित हवाई निरीक्षण व समुद्रात गस्त घेण्यास बांधील. कोणतीही बेकायदेशीर मासेमारी होऊ नये यासाठी सर्व उपाययोजना वापरण्याचे निर्देश. व्हेसल ट्रॅकिंग सिस्टीमद्वारे माहितीची देवाणघेवाण सुनिश्चित केली जाणार.**

**७ : न्यायालयास दर तीन महिन्यांनी प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश : मत्स्य संचालनालय, तटरक्षक दल आणि पोलिस अधीक्षक यांनी तीन महिन्यांतून एकदा न्यायालयास प्रगती अहवाल द्यावा. पुढील अहवाल सादरीकरणाची तारीख - २ सप्टेंबर २०२५.**